## प्रागैतिहासिक कालखंड

### ❖ अश्म युग

1. **पुराणाश्म युग (Palaeolithic Age) : इ. स. पूर्व 9000 पर्यंतचा कार्यकाळ.**

- भटक्या अवस्थेतील जीवन जगत असताना जंगलातील सुरक्षित अशा डोंगरमाथ्यावर किंवा पायथ्यालगत पाण्याच्या प्रवाहाजवळ (नदीकाठी) तत्कालीन मानव वस्ती करून राहत असे.
- याबरोबर निसर्गत: निर्मित गुहांमध्ये मानव रहात असल्याचे नमुने उपलब्ध आहेत. उदा. मध्य प्रदेशातील रायसेन जिल्ह्यातील भीमबेटका.
- भीमबेटका येथील गुहेत वास्तव्यादरम्यान भिंतीवर मानवाने तीक्ष्ण हत्याराने चित्रे कोरली आहेत.त्यातपक्षी, प्राणी, मानवी दैनंदिन जीवन, शिकारीचे प्रसंग इत्यादींचा समावेश असत.
- या काळातील मानव मुख्यत: शिकार करत, त्यासाठी दगडी हत्यारांचा वापर होत असे म्हणून या काळाला **पाषाण युग** म्हटले जाते. दरम्यान शेतीचे ज्ञान नव्हते.

**2. मध्याश्म युग (Mesolithic Age): इ.स.पूर्व 9000 ते 4000 पर्यंतचा काळ.**

- पुराणाश्म युग व नवाश्म युग यांच्यामधील कालखंड म्हणजे मध्याश्म युग होय.
- या युगात शिकार करणे, मासेमारी करणे, कंदमुळे गोळा करणे हे मुख्य व्यवसाय केले जात, हळूहळू प्राणी पाळण्यास सुरुवात झाली.
- शिकारीसाठी दगडाची तीक्ष्ण हत्यारे वापरली जाऊ लागली.

**३. नवाश्म युग (Neolithic Age) : इ.स.पूर्व 4000 ते 1500 पर्यंतचा काळ.**

- भटकंती संपून मानवाने स्थायी जीवन पद्धतीची सुरुवात केली.दरम्यान राहण्यासाठी दगड, मातीची चौकोनी आकाराची घरे बनवत.
- दरम्यान मातीच्या भांड्यांचा वापर सुरु झाला.
- पाळीव प्राण्यांच्या संख्येत वाढ झाली.
- स्थायी जीवनामुळे शेतीची सुरुवात झाली. ज्यात रागी, कुलिथ, गहू, तांदूळ यांचे उत्पादन घेतले जात.

**4. ताम्रपाषाण युग (Chalcolithic Age) :**

- नवाश्मयुगाच्या शेवटी तांबे या धातूच्या वापरास सुरुवात झाली.
- दरम्यान तांबे व दगड या दोन्हींचा उपयोग होत असल्याने या युगास **ताम्रपाषाण युग** असे म्हटले जाते.
- पाळीव प्राण्यांत गाय, म्हैस, शेळीयांचा समावेश होता मात्र घोडा या बद्दल जास्त माहिती नसावी.
- अहर, कायथा, प्रभास, रंगपूर, सावळदाहि ताम्रप्राषाण संस्कृतीशी संबधित ठिकाणे आहे.

Sachin Gulig

- मसूर, तांदूळ, बाजरा,गहू,कापूस इत्यादी पिकांची शेती केली जात.
- कापड बनवण्याची कला अवगत होती, स्त्रीला देवी म्हणून पूजा केली जात.
- मृत व्यक्तींना पुण्याची पद्धत होती.
- प्रागैतिहासिक मानवाला लेखन कला अवगत नव्हते.

## हडप्पा संस्कृती

- ✓ १९२१ साली या संस्कृतीमधील हडप्पा या शहराचा शोध लागल्याने **हडप्पा** हे नाव पडले.
- ✓ हडप्पा कालीन अनेक शहरे सिंधू नदीच्या काठी सापडल्याने **सिंधू संस्कृती** हे नाव पडले.
- ✓ हि संस्कृती तत्कालीन भारतातील पंजाब, हरियाना, राजस्थान, गुजरात, जम्मू-काश्मीर इ. प्रदेशात विस्तारित संस्कृतीत होती.\
- ✓ हे संपूर्ण नागरीकरण सिंधू व तिच्या उपनद्या घागरा, सरस्वती या नद्यांच्या काठी वसलेले होते.
- ✓ हडप्पा संस्कृतीचा साधारत: काळ इ.स.पूर्ण ३५० ते इ.स.पूर्व १८०० होता.
- ✓ मात्र या हडप्पा संस्कृतीचा उगम कसा झाला, स्थापना कोणी केली, याविषयी अजूनही माहिती उपलब्ध नाही.

### ❖ हडप्पा कालीन महत्वाची ठिकाणे व त्यांचे संस्थापक:

- जम्मू-काश्मीर: मंद (उत्तर सीमा)
- पंजाब (पाकिस्तान): हडप्पा (दयाराम सहानी)
- हरियाणा:- बनवाली (RS विष्ठ), राखिगढि, मिथातई, रोपर (YD शर्मा), सोथी
- उत्तर प्रदेश:- आलमगीर (यज्ञदत्त शर्मा), पूर्व सीमा
- राजस्थान:- कालीबंगण (A घोष)
- सिंध (पाकीस्तान):- मोहेनजोदारो (राखालदास बनर्जी), चान्हूदरो (गोपाल मुजुमदार), कोटदिजी (धुर्ये)
- बलुचिस्तान:- सूटकाजेंदर (RL स्टाईन)
- गुजरात:- धौलविरा (RS विष्ठ, नागेश्वर), लोथल (रंगनाथराव), रोजडी, रंगपूर (माधवस्वरूप, वत्स, भागातत्राव)

### ❖ हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्ये:-

**१) नियोजनबद्ध नगरे:-**

- शहराची ग्रीड पद्धतीने रचना
- सिडॅटल आणि सामान्य भागात शहराची रचना केली होती.
- सिडॅटल म्हणजे उच्च कुलीन व शासनकर्ते राहत असावेत.
- सर्व ठिकाणी घर बांधण्यासाठी सारख्याच आकाराच्या भाजलेल्या विटांचा वापर केलेला आढळतो.
- शहरात पूर्ण झाकलेली गटारांची व्यवस्था होती, सफाईसाठी मनहोल ठेवले होते.

Sachin Gulig

- काही शहरात सार्वजनिक ठिकाणांचा समावेश होता. उदा., मोहेनजोदारो येथील धान्य कोठारे आणि सार्वजनिक स्नान कुंड (कदाचित धार्मिक विधीपूर्वी स्नान करण्यासाठी याचा वापर होत असावा)
- सुरक्षेसाठी शहराभोवती तटरक्षक भिंती होत्या.

२) **शेती:-**

- गहू, बार्ली, कापूस, तांदूळ, राई इ. पिकांचे उत्पादन घेतले जात.
- जमिनी नांगरल्या जात, शेतीला सिंचनासाठी नद्यांवर बंधारे बांधले होते.
- अन्नधान्य साठवण्यासाठी गोदामे होती.
- पाळीव प्राणी पाळले जात. उदा: बैल, म्हैस, शेली, डुक्कर, उंट, गाढव
- हत्ती, हरीण इ. प्राण्यांविषयी माहिती होती, मात्र घोडा त्यांना माहित नसावा.

३) **तंत्रज्ञान व कला:-**

- हत्यारांसाठी मुख्यता ब्रॉंझ आणि दगडांचा वापर होत असे.
- विविध नाणी, व्यापारी जहाजे बनवली जात. सोनार विविध आभूषणे बनवत. त्यासाठी सिएटाईट आणि लॅपिस लॅझुली दगडांचा तसेच सोने आणि तांब्याचा वापर होत.
- मोहेंजोदडो येथे नर्तिकेची मूर्ती सापडली आहे.
- कुंभार कामासाठी चाकाचा वापर होत.

४) **व्यापार:-**

- संपूर्ण प्रदेशात सारखीच वजन व मापे होती.
- मापांसाठी दशमान पद्धतीचा वापर होत, हि मापे बनवण्यासाठी वेगवेगळ्या दगडांचा वापर होत असे.
- जहाजांचा वापर व्यापारासाठी होत, तसेच बैलगाडीही वापरत.
- लॅपिस लॅझुली या मौल्यवान दगडाचा व्यापार दूरस्थ भागाबरोबर चालत.

५) **राजकीय व्यवस्था:-**

- या व्यवस्थेबद्दल ठोस पुरावे मिळत नाहीत, मात्र मोठ्या प्रमाणात विस्तारलेल्या नागरीकरण आणि मोहेंजोदारो येथील सार्वजनिक कुंड व सापडलेल्या पुरोहित सदृश्य मूर्तींच्या आधारे असे येथे शासन व्यवस्था अस्तित्वात होती असा अंदाज लावता येईल.

६) **धर्म:-**

- नैसर्गिक शक्ती आणि स्त्री यांची देवता म्हणून पिज केली जात,
- तत्कालीन नाणी आणि मुद्रांवर पशुपती शिवाची चित्रे कोरली जात.
- पिंपळाचे झाड आणि एक शिंगी गेंडा इ. प्राण्यांची मुद्राचित्र सापडली आहेत.
- धर्माबद्दल काहीही सांगता येत नाही कारण: लिखित पुरावा उपलब्ध नाही, मंदिरे आढळत नाहीत.

Sachin Gulig

**७) लिपी:-**

- हडप्पा कालीन लोक चित्र लिपी वापरत असत. मात्र आजपर्यंत त्याचा अर्थ समजलेला नाही.

**८) समाज:-**

- शस्त्रांचा अभाव असल्याने समाज शांतताप्रिय होता.
- स्त्रीयांना समाजात मनाचे स्थान होते.
- समाजात जातीभेद नव्हता.
- मात्र गुलामगिरी प्रथा अस्तित्वात होती.
- मृत व्यक्तींना पुरण्याची पद्धत होती.

**९) सभ्यतेचा अंत:-**

- या सभ्यतेच्या उगम प्रमाणे अस्ताविषयी हि कोणतीही माहिती उपलब्ध नाही.
- अंदाजे इ.स.पूर्व १८०० मध्ये सभ्यतेचा अंत झाला असावा:
- काही करणे दिली आहेत
- १. दुष्काळ आणि भूकंप
- २. सिंधू नदीने पत्र बदलले असावे
- ३. प्रदेशातील शुष्कता वाढून घग्गर नदी कोरडी पडली असावी.
- ४. परदेशी आर्यांचा हल्ला.
- ५. परिस्थितीकिय असमतोल.
  मात्र यापैकी कोणतेही एक कारण इतिहासकारांना मान्य नाही परंतु अर्याच्या आक्रमणाचा परिणाम पुढे दिसतो.

## वैदिक काळ

**भारतात आर्यांचे आगमन इ.स.पूर्व 1500 च्या आसपास झाल्याचे आढळून आले आहे.**

**वैदिक काळाचे दोन भागात विभाजन होते.**

***A) पूर्व वैदिक काळ (इ.स.पूर्व 1500 - 1000)***     *B)* ***उत्तर वैदिक काळ (इ.स. पूर्व 1000 - 500 )***

### 1 ) पूर्व वैदिक काळ (इ.स.पूर्व 1500-1000)

- आर्य मुळचे अफगाणिस्तान, मंगोलिया यालाच “मध्य आशिया” किंवा आशिया व युरोप खंडाच्या मध्यभागी अर्थातच “युरेशिया” येथून आल्याचे सिद्ध झाले आहे.
- आर्य मुख्यत भटक्या जमातीचे होते. मुख्य भर पशुपालनावर होता. त्यातही गायींना जास्त महत्व होते. गाय हे संपत्तीचे प्रतिक मानले जाई.
- त्यांना शेतीचे ज्ञान असल्याचा उल्लेख ऋग्वेदात सापडतो.

Sachin Gulig

- आर्यांची जमात भटकी, असल्याने भारतात अनेक टोळयांमध्ये व टप्प्याटप्प्याने आले.
- काही इतिहासकारांच्या मते लढाऊ आर्यांनी नवशस्त्रांच्या आधारे भारतातील सुसज्य अशा हडप्पा (सिंधू) संस्कृतीवर हल्ला करून जिंकून घेतले.
- जिंकलेला प्रदेश म्हणजे अफगाणिस्तान, पाकिस्तान, सिंधूचे खोरे या भागात वास्तव्य असे.
- आर्यांनी ज्या स्थानिकांना जिंकून घेतले त्यांना "दासू" म्हटले जाऊ लागले तर "दास" हा शब्द आर्यांच्या सुरुवातीला आलेल्या गटासाठी वापरला गेला.
- आर्यांना घोडा हा प्राणी ज्ञात असावा, म्हणजे वेगवान घोड्यांच्या वापरामुळे व चपळतेमुळे स्थानिकांवर विजय मिळवणे शक्य झाले. त्यांनी ब्राँझचा वापर शस्त्र म्हणून केला तसेच रथाचाही वापर केला.
- पूर्व वैदिक काळात जमिनीच्या खाजगी मालमत्तेची संकल्पना अजून अस्तित्वात नव्हती.
- आर्य हे "जमात" पद्धतीने रहात असत. या जमातीत चांभार - कुंभार – सुतार – लोहार इ. कारागीर असत.
- सिंधू व तिच्या उपनदी प्रदेशांचा सप्त सिंधवा असा उल्लेख आढळतो.
- आर्य तांबे किंवा ब्रॉझला " आयस " म्हणत.
- राजकीय व्यवस्थेत जमातीच्या प्रमुखाला " राजन " म्हणत. हे पद वंशपरंपरागत नव्हते. त्यासाठी निवडणुका होई. राजन कडे मर्यादित अधिकार होते.
- राजनची निवड समिती करत. राजनच्या मदतीला पुरोहित व सेनानी हे अधिकारी असत.
- राजनकडे स्वतःची सेना नव्हती
- आर्यांच्या सभेला सभा, समिती, विदाथा, गण म्हटल्याचे ऋग्वेदात उल्लेख आहेत. सामाजिक भेदभाव नव्हता, समता आधारित समाज व्यवस्था अस्तित्वात होती.
- जमातीतील लोक स्वत: कर देत. त्यास बली असे म्हणत.
- कुटुंब पद्धतीला "गृह" असे म्हणत, जमातीचा आधार नातेसंबंध होता.
- लग्न हि संकल्पना अस्तित्वात होती. विधवा विवाहास मान्यता होती. मात्र बालविवाहाचे उल्लेख आढळत नाहीत.
- कुटुंबात "पितृसत्ताक" व्यवस्था होती, म्हणून पुत्र जन्मण्यासाठी कामना केली जात त्यासाठी ऋग्वेदात काही मंत्र म्हटले जात.
- ऋग्वेदाच्या शेवटी चातुर्वर्ण व्यवस्थेचा विकास झाला त्यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र हि व्यवस्था व्यवसायावर आधारित बनली.
- अग्नी, इंद्र, वरूण, सोम, अदिती, उषा, इत्यादी देवांचा उल्लेख आढळतो.
- ऋग्वेदीक काळ / पूर्व वैदिक काळातील सर्वात महत्वाचा देव म्हणजे इंद्र होय. त्याला पुरंदर अर्थातच किल्ले उध्वस्त करणारा होय.
- तसेच नैसर्गिक शक्तींचीही पूजा केली जात. मात्र पूजेचा मुख्य मार्ग म्हणजे यज्ञ होता.

Sachin Gulig

## वैदिक कालीन नद्या

**सिंधू नदीचा सर्वाधिक वेळा उल्लेख ऋग्वेदात येतो.**

**सिंधू नदीच्या उपनद्यांची वैदिककालीन नावे.**

| | | |
|---|---|---|
| झेलम - वितस्ता | चिनाब - असिक्नी | बियास - परूस्नि |
| सतलज - शुतुद्री | इंडस - सिंधू | गोमती - गोमल |
| नदितरण / घागरहाक्रा - सरस्वती | | |

## 2) उत्तर वैदिक काळ : कार्यकाळ (इ.स. पूर्व 1000-500)

- ऋग्वेदाची निर्मिती फक्त पूर्व वैदिक काळात झाली मात्र इतर सर्व वेदांची निर्मिती उत्तर वैदिक काळात झाली.
- या काळातील भारत आणि पुरू या मुख्य जमाती होय, या दोघांची मिळून "कुरु" हि जमात बनली.
- ज्ञात तांब्याच्या धातुबरोबर या काळात लोखंडाच्या वापरास सुरुवात झाली होती.
- उत्तर वैदिक काळात शेती हा मुख्य व्यवसाय बनला. मात्र नांगरणीसाठी लाकडी नांगराचा उपयोग केला जात.
- नांगरासाठी "फळा, लंगाळा, किंवा सिरा" इ. शब्द वापरले जात होते.
- लोखंडाचा उपयोग मुख्यत शिकार करणे, झाडे तोडणे यासाठी करत असावेत.
- शेतीत गहू आणि तांदूळ हि मुख्य पिके होत.
- जमातीच्या सभा, समितीचे महत्व कमी झाले, त्याची जागा जमातीच्या बलवान प्रमुखाने घेतली. तेच पुढे सत्ताधीश झाले.
- स्त्रियांना सभेत स्थान राहिले नाही.
- राजनचे पद वंशपरंपरागत झाले ते सक्तीने नियमित कर वसूल करत असे.
- राजाने आपले महत्व वाढवण्यासाठी "राजसूय" व अश्वमेध इ. यज्ञ करण्यास सुरुवात केली.
- राजाला मदतीसाठी सेनानी व पुरोहित होतेच मात्र त्यांनी खडे सैन्य बाळगले नव्हते.
- वेदांच्या उत्पत्तीमुळे वर्णव्यवस्था कठोर बनली.

  त्यातील चौथ्या क्रमांकावरील शूद्राव्यतिरिक्त इतर तीन वर्णांना संस्कार व गायत्री मंत्र म्हणण्याचा अधिकार दिला होता.

- यज्ञांचे महत्व याच काळात वाढले. यज्ञात गायींना बळी दिली जात. यज्ञांमुळे ब्राम्हणांचे महत्व वाढले आणि त्याला पर्याय म्हणून जैन, बौद्ध, धर्म उदयास आले.
- या काळात मानवी जीवनाच्या 4 आश्रमांच्या संकल्पनेची सुरुवात झाली.

  *१. ब्रम्हचर्य 2. गृहस्थ 3. वानप्रस्थ ४. सन्यास*

**उत्तर वैदिक काळात इंद्र व इतर देवांचे महत्व कमी होऊन पशुपती शिवा हे मुख्य देव बनले.**

Sachin Gulig

# ★ वैदिक साहित्य ★

वैदिक साहित्याला संहिता असेही म्हणतात, संहितेत ४ ग्रंथांचा समावेश आहे.

## १. ऋग्वेद :

- इराणचा प्राचीन ग्रंथ "अवेस्थ" या ग्रंथाशी साधर्म्य असणारा हा ग्रंथ आहे.
- ऋग्वेदात "यज्ञ" मंत्रांचा समावेश आहे.
- ऋग्वेदाच्या 3 ऱ्या भागात गायत्रीमंत्राचा उल्लेख येतो. हे गायत्री मंत्र विश्वामित्रांनी रचल्याचे मानले जाते. तसेच सातव्या भागात दशराजन युद्धाबद्दल वर्णन आहे. हे वशिष्ट ऋषिंनी लिहिल्याचे मानले जाते. दशराजन युद्ध "रावी" नदीच्या काठी झाले होते.
- ऋग्वेदाच्या दहाव्या भागात "पुरुष सुत्त" या विषयी उल्लेख आहे. त्यात चार वर्ण ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, आणि शुद्र यांचा उल्लेख आढळतो.
- दहाव्या भागातील "नासदीय सुत्त" भागात 40 नद्यांचा उल्लेख आढळून आला आहे.

## २. सामवेद :

- ऋग्वेदातील सर्व मंत्रांचे काव्यस्वरुपात मांडणी केली आहे. सामवेद हे सूर्य देवतेला समर्पित आहेत.

## 3. यजुर्वेद :

- या वेदात यज्ञासंदर्भातील मंत्र, यज्ञाच्या पद्धती आणि कर्मकांड याविषयी गद्य आणि पद्य इ. रचना आढळतात.
- पुरोहीतांसाठी यजुर्वेदात अध्वर्यू असा उल्लेख आढळतो.

## 4. अथर्ववेद :

- जादूटोणा, वाईट करण्यासाठीचे मंत्र इ. अथर्व वेदात आढळतो.
- याची निर्मिती अथर्वा आणि अंगिरस या दोन ऋषींनी केली म्हणून अथर्ववेद हे नाव पडले.
- यात पुरोहितास "ब्रम्ह" असा उल्लेख आहे.
- यात कुरु आणि पांचाल जनपदानां श्रेष्ठ तर मगध व अंग जनपदांना वात्स्य किंवा कनिष्ट असा उल्लेख आढळतो.
- अथर्ववेदाला श्रेष्ठ वेद, ब्रम्ह वेद, भौतिक वेद, नवीन वेद, लौकिक वेद इत्यादी नावांनी ओळखतात.
- ऋग्वेदात उल्लेखित स्त्रियां :- अपारा, घोषा, मुंडा, विश्वरा, कक्षावृत्ती, राची इ.
- गार्गी आणि मैना यांचा उल्लेख उपनिषदात आढळतो.

❖ **राजसूय यज्ञ :** राजाची ताकद किंवा शक्ती दाखवण्यासाठी हे यज्ञ केले जात.

❖ **अश्वमेध यज्ञ :** या यज्ञ प्रकारातील घोडा जेथे जाईल तो प्रदेश यज्ञ करणाऱ्या राजाचा मानला जात, जो तो घोडा अडवेल त्याला या राजा सोबत युध्द करावे लागे.

Sachin Gulig

## वेदांच्या तत्वज्ञानाचे सत्य दर्शन घडवण्यासाठी सहा दर्शने लिहिली गेली.

न्याय दर्शन – गौतम  वैशेषिक दर्शन – कणाद  सांख्य दर्शन – कपिल

योगदर्शन - पतंजली  पूर्व मिमांशा दर्शन - जैमिनी  उत्तरमिमांशा - बदरायण

| वेद | ब्राह्मण यांचा उल्लेख | वैशिष्ट्य | उपवेद | लेखक |
|---|---|---|---|---|
| १)ऋग्वेद | होता/होत्र | देवतांची स्तुती | धनुर्वेद | प्रजापत्य |
| 2)यजुर्वेद | अध्वर्यू | यज्ञ आणि कर्मकांड | स्थापत्यवेद | विश्वामित्र |
| 3)सामवेद | उद्गाता | संगीत स्वरुपात मंत्र | गंधर्ववेद | नारद |
| 4)अथर्ववेद | ब्रह्म | तंत्र, मंत्र, जादूटोणा | आयुर्वेद | विश्वकर्मा |

**1. ब्राह्मण्य :** यज्ञासाठी केले जाणारे कर्मकांड आणि त्याचे महत्व नमूद करतात.

**2. अरण्यके:** वनांमध्ये यज्ञ करणे शक्य नसल्याने जंगलात राहणाऱ्या लोकांसाठी धार्मिक कर्मकांड यात दिली आहेत. चार आश्रमांचा उल्लेख प्रथम यातच आला आहे.

ब्रम्हचर्य, गृहस्थ, वनप्रस्थ व सन्यास

**3. उपनिषद :** वैदिक कर्मकांडाचे टीकात्मक परीक्षण करणारे ग्रंथ आहे. हा वेदांचा अंतिम भाग असल्याने त्यांना वेदांत असेही म्हणतात.

> उपनिषदांची एकूण संख्या एकूण 108 असल्याचे मानले जाते.
पैकी **वृहदाव्यकोपनिषद** हे सर्वात मोठे उपनिषद आहे.

## मुंडक उपनिषदातील महत्वाचे विचार

सत्यमेव जयते - सत्याचा विजय  असतो मा सद्गमय - असत्याकडून सत्याकडे

तमसो मा ज्योतिर्गमय - अंधाराकडून प्रकाशाकडे चला.  मृत्योर्मा अमृतं: गमय - मृत्युकडून अमरतेकडे चला.

## इतर साहित्य

**१) वेदांग:** सर्वसामान्यांना वेद समजावून सांगण्यासाठी उत्तर वैदिक काळात वेदांगांची निर्मिती करण्यात आली.

*एकूण सहा वेदांग आहेत. व्याकरण, ज्योतिष, निरुक्त, शिक्षा, छंद व कल्प.*

**२) उपवेद :** एकूण सहा उपवेद आहेत. आयुर्वेद, धनुर्विद्या, गंधर्व, स्थापत्य, कला, अर्थशास्त्र.

**३) पुराण :** जुन्या धर्म, तत्वज्ञान व साहित्याचे पुनरुज्जीवन करण्यासाठी लिहिलेल्या ग्रंथांना पुराण म्हटले जाते.

**४) महाकाव्ये:** रामायण, महाभारत हि दोन्ही महाकाव्ये संस्कृत भाषेत असून लिहिण्यासाठी ब्राम्ही लिपी वापरली आहे.

**1. रामायण:** वाल्मिकीने 5 – १२ व्या शतकात निर्मिती केली असावी.

Sachin Gulig

**२. महाभारत:** महर्षी ऋषींनी इ. स. पूर्व 10 ते इ. स. 4 थ्या शतकात निर्मिती केल्याचे आढळते.

**3. श्रीमद् भागवत गीता :** यात पहिल्यांदा वैष्णव धर्माचा उल्लेख आला आहे.

- महाभारताच्या युद्धभूमीवर कृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेश यात आहे.

## श्रीमद् भगवत गीतेचे अनुवाद

इंग्रजी : विल्यम विल्किन्स (एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल - 1784)

मराठी : गीता रहस्य – टिळक

संस्कृत : गीता – शंकराचार्य

बंगाली : गीता – मालाधर बसू

## महत्वपूर्ण ग्रंथ व त्यांचे लेखक

| ग्रंथ | लेखक | वैशिष्ट |
|---|---|---|
| अष्टाध्यायी | पाणिनी | मौर्यपूर्व कालीन सामाजिक धार्मिक स्थितीचे वर्णन |
| मुद्राराक्षक | विशाखादत्त | नंद, मौर्य, गुप्त वंशाची माहिती. |
| अर्थशास्त्र | चाणक्य | राजकारण व प्रशासन बाबत माहिती |
| महाभाष्य | पतंजली | अष्टाध्यायी व वृत्तीका ग्रंथाचे परीक्षण |
| हर्षचरित | बाणाभट्ट | हर्षांच्या जीवनाविषयी ग्रंथ |
| राजतरंगिणी | कलहण | ऐतिहासिक ग्रंथ |

## स्मृती साहित्य

स्मृती म्हणजे स्मरण करून लिहिलेले ग्रंथ प्राचीन काळात यांची निर्मिती केली आहे.

**एकूण 6 स्मृती ग्रंथ आहेत.**

### 1 . मनुस्मृती

- चार आश्रमांचे वर्णन आहे.
- वडिलांनी घेतलेले कर्ज फेडणे मुलाचे कर्तव्य
- सती प्रथेचे उल्लंघन
- शिक्षण निशुल्क असावे.

पती 7 वर्षे दूर असेल किंवा पतीने सन्यास घेतला तर स्त्रियांना दुसरा विवाह करण्यास परवानगी.

2. **यज्ञवाल्क्य स्मृती :** सती प्रथेला विरोध. - वडिलांनी घेतलेले कर्ज फेडणे मुलाचे कर्तव्य नाही.
3. **नारद स्मृती ;** सती प्रथेला विरोध - स्त्रियांना पुनर्विवाहास परवनागी.

Sachin Gulig

4. **ब्रह्स्पती :** सती प्रथेचे समर्थन
5. **कात्यायन :** शूद्रांना वेद ऐकणे आणि वाचण्याचे अधिकार असू नयेत.
6. **देवल स्मृती :** धर्मांतरण केलेल्या हिंदूंना पुन्हा हिंदू धर्मात घेण्याचा उल्लेख.

## ★ महाजनपद काळ ★

. 16 महाजनपदे हि भारतातील पहिली साम्राज्ये होती.

. लोखंडाचा शोध आटणी त्याचा वापर गंगेच्या मैदानी भागात जंगलतोड करून साम्राज्य निर्मिती केली.

. भगवती सूत्र, परीक्षितपर्वण या जैन ग्रंथातून आणि अंगुत्तर निकाय या बौद्ध ग्रंथातून महाजन पदाविषयीमाहिती उपलब्ध आहे.

. ब्रिटीश वास्तुविशारद अलेक्झांडर कनिंगहम यांनी19 व्या शतकात तक्षशीला,अहिछत्र,संकीसा, श्रावस्ती, कौशंबी, वैशाली, नालंदा इ. प्राचीन शहरांचा शोध लावला.

## महाजनपदे

| नाव | राजधानी | शासक |
|---|---|---|
| अंग | चंपा(बिहार) मालीनि आजचे नाव चंपापूर | |
| मगध | राजग्रीह (बिहार) पाटलीपुत्र, पटना | बिम्बिसार |
| मल्ल | खुशिनारा (कैसा, UP) पावा(परडोना) | |
| वज्जी | वैशाली(बिहार) | चेतक (लीच्छवी नरेश) |
| कोशल | श्रावस्ती(UP) साहेत-माहेत | प्रसेनजीत |
| काशी | वाराणशी(UP) | |
| चेट्टी | शुक्तीमती/ बुंदेलखंड- सोत्थीवातीनगर | |
| कुरु | इंद्रप्रस्थ(दिल्ली) | इशूकरा |
| वत्स | कौशंबी (UP)कोसमगाव | उदयन |
| पांचाल | अहिछत्र (रामनगर) | कंपिल्य |
| मत्स्य | विराटनगर (RJ+UP) बैरत | विराट |
| शूरसेन | मथुरा | ब्रिशनिश, अवंतीपुत्र |
| अवंती | उज्जैन, महिष्मती(महेश्वर-MP) | प्रत्योद |
| अस्साख | पोटना (बिधना) | नर्मदा, गोदावरी चा प्रदेश |
| कंभोज | राजपुरा (काश्मीर) | |

Sachin Gulig

| | | |
|---|---|---|
| गंधार | तक्षशीला(पाकिस्तान) | पुष्कर सरीन |

## मगध साम्राज्याच्या उद्याची कारणे :

- मगध साम्राज्य बिम्बिसारच्या काळापासून प्रबळ होण्यास सुरुवात झाली.
- गंगेच्या त्रिभुज प्रदेशांमुळेव्यापार, दळणवळण, सोयीस्कर होते.परिणामी आर्थिक परिस्थिती उत्तम होती.
- राजधानी राजग्रीहच्या तीन बाजूनी डोंगर होते,एका बाजूने नदी असल्याने हल्ला करणे शक्य नव्हते.नंतर राजधानी पाटलीपुत्र (पटना) येथे हलवली.
- साम्राज्यात मोठ्या प्रमाणातलोह(लोखंडाच्या) खाणी होत्या.त्याचा उपयोग शेती आणि लष्कर बळकट करण्यासाठी झाला.
- आर्य आणि अनार्यांचे संबंध चांगले होते. उदा: समाजात एकता व समानतेची भावना होती.

## महत्वाचे शासक

### १) बिंबीसार: इ.स.पू.545 ते इ.स.पू.493

- हे मगध साम्राज्याचे संस्थापक होते. (अंदाजे)
- बिंबीसारनेकौसल शासक प्रसेनजीतची बहिण महाकौसल सोबत लग्न केले, हुंडा म्हणून काशी हे गाव मिळाले.तसेच विदेह्ची राजकुमारी खेमा सोबतही लग्न केले.बिंबीसारने चंपा वर यशस्वी आक्रमण केले.
- अवंतीचा शासक प्रत्योद्साठी त्यांनी जीवक हा वैद्य पाठवला.
- बिंबिसारने महावीर जैन, आणि गौतम बुद्ध यांच्या भेटी घेतल्या होत्या.बिंबिसार कोणत्या धर्माचे होते याबाबत शंका आहे. बिंबिसारने संतासाठीजहाज प्रवास मोफत केला होता.
- बिंबिसारचा खून त्यांचाच मुलगा अजातशत्रू याने केला.

### २) अजातशत्रू: इ.स.पू 493 तेइ.स.पू 462

- शेजारील कौशल, लिछवीअवंती बरोबर युद्ध करून राज्य विस्तार केला.
- वर्धमान महावीर आणि गौतम बुद्ध यांचे समकालीन होते.
- यांनी बुद्धांच्या मृतुनंतर राजग्रीह येथे पहिली बौध परिषद भरवली.
- अजातशत्रूनंतर त्यांचा मुलगा उद्यान शासक बनला, त्यांनीचपाटलीपुत्र शहराची स्थापना केली.

मगध साम्राज्यावर राज्य केलेली इतर घराणी

***१) हरण्यक घराणे : इ.स.पू. 462 ते इ.स.पू. 430***

***२) शिशुनाग घराणे: इ.अ.पू. 430 ते इ.स.पू 364 – शिशुनाग***

***३) नंद घराणे : इ.स.पू 364 ते इ.स.पू. 324–महापद्मनंद***

Sachin Gulig

## * परकीय हल्ले *

### @ इराण व मसेडोनियाचे हल्ले.

- इ.स.पू. सहाव्या शतकात इराण व मसेडोनियाच्या शासकांनी भारतावर हल्ले केले. अलेक्झांडर हल्ला करेपर्यंत भारताचा वायव्य भाग ग्रीकांच्या ताब्यात असावा.

परिणाम: व्यापार आणि उद्योगांमध्ये वाढ झाली.

भारतात खरोष्टी लिपीचा प्रसार झाला.

मौर्य स्थापत्य कलेवर ग्रीक कलेचा प्रभाव

इराणी लोकांकडून भारतीय संपन्नतेची माहिती मिळाल्याने अलेक्झांडरने भारतावर आक्रमण केले.

### @ अलेक्झांडरचे भारतावर आक्रमण :

इ.स.पू. 326-325दरम्यान अलेक्झांडरने भारतावर हल्ला केला. यावेळी मगध वर धनानंद यांचे राज्य होते. धनानंदने चाणक्यांचा अपमान केल्याने त्यांचे राज्य जिंकण्यास चन्द्रगुप्तास मदत केली.

अलेक्झांडरच्या हल्ल्याचे परिणाम:

- पहिल्यांदायुरोप व भारत यांचा संबंध आला.
- वायव्य भागात ग्रीक वसाहतींची स्थापना.
- वायव्य भागात मौर्य साम्राज्याच्या विस्तारासाठी अनुकूल स्थिती तयार झाली.

## • बौद्ध व जैन धर्म

**उदयाची कारणे :**

- वर्ण व्यवस्थेत विभागल्या गेलेल्या समाजात तणाव निर्माण झाला होता.तेंव्हाजैन व बौद्धधर्मांनी समानतेला महत्व दिले.
- ब्राम्हण धर्मात यज्ञात पशु बळी दिला जात.मात्र हे पशु शेतीसाठी आवश्यक होते. म्हणून जैन आणि बौद्ध धर्मांनी अहिंसा हे तत्व स्वीकारले.
- ब्राह्मण धर्माने शहरीकरण आणि व्यापार यांना दुय्यम स्थान दिले. त्यामुळे सर्व वर्णांना समान लेखणाऱ्या जैनआणिबौद्ध धर्माकडे लोक आकर्षित झाले.

## • जैन धर्म

. जीन म्हणजे सर्व इंद्रियांवर विजय मिळवणारा. जैन शब्दाची उत्पती जीन या शब्दापासून झाली आहे.

. जैन मान्यतेनुसार जैनांचे एकूण 24 धर्मोपदेशक / तीर्थकरहोते.

. पहिले ऋषभदेव, 23 वे वाराणशीचेपार्श्वनाथ तर 24 वे वर्धमान महावीर होते.

. वर्धमानमहावीरांचा जन्म कुंडग्राम, वैशाली(बिहार) येथे इ.स.पू. 540 मध्ये झाला.

. वडिलांचे नाव सिद्धार्थ तर आईचे नाव त्रिशला होते.

. महावीरांनी वयाच्या 30 व्या वर्षी घर सोडले.12 वर्ष तपस्येनंतर त्यांना केवलज्ञान प्राप्त झाले.

. वयाच्या 72 व्यावर्षी इ.स.पू. 468मध्येराजगिर जवळील पावापुरी येथे मृत्यू झाला.

## • जैन धर्माची त्रिरत्ने

१. सम्यक दर्शन – चांगले/ उत्तम विचार

२. सम्यकज्ञान–चांगले/ उत्तम ज्ञान

३. सम्यकचारित्र्य / उत्तमआचरण

Sachin Gulig

## जैन धर्मातील पाच तत्वे

१) अहिंसा २) सत्य ३) अस्तेय (चोरी करू नये) ४) अपरिग्रह (संपत्तीन जमवणे) ५)ब्रम्हचर्य

. महावीर नंतर जैन धर्माचे दोन पंथात विभाजन झाले.

१. दिगंबर २. श्वेतांबर

- दिगंबर हे निर्वस्त्र असतात तर श्वेतांबर हे पांढऱ्या रंगाचे वस्त्र परिधान करतात.
- दिगंबरांचे नेतृत्व भद्रबाहूने केले. तर श्वेतांबरांचे नेतृत्व स्थुलभद्र यांनी केले.
- देवांचे अस्तित्व मान्य पण तीर्थकरांपेक्षा दुय्यम स्थान होते. त्यांनी जाती, वर्ण व्यवस्थेचे समर्थन केले नाही किंवा नाकारले सुद्धा नाही.
- जैन धार्मिक संघात स्त्री-पुरुष दोघांना प्रवेश होता.

-मगध साम्राज्यात दुष्काळ पडल्याने भद्रबाहूंच्या नेतृत्वात एक गट दक्षिणेत गेले.त्यात मौर्य सम्राट चंद्रगुप्त हे हि होते. यांचा गट श्रवणबेळगोळ येथे राहिल्याचे मानले जाते. या गटाने निर्वस्त्र राहून सर्व नियमांचे पालन केले.

- मात्र उत्तरेत स्थूलभद्रयांच्या नेतृत्वात थांबलेल्या गटाने सफेद वस्त्र परिधान केले.
- वस्त्रांचा त्याग हा संदेश महावीर यांनी दिला होता.

-कलिंगच राजा खारवेलने जैन धर्मास राजाश्रय दिला.

- जैनधर्म हा थोडासा कर्मठ राहिला. मात्र बौद्ध धर्माप्रमाणे जैन धर्म लोप पावला नाही.तो अजून हि अस्तित्व टिकवून ठेवण्यात यशस्वी ठरला आहे.

-जैन ग्रंथ मुख्यत:प्राकृत भाषेत होती.जैन साहित्यामुळे अनेक प्रादेशिक भाषांचा उदय झाला.

- लिखाणासाठी अर्धमागधी लिपीचा वापर होत.
- गुजरात येथील वल्लभी हे जैन धर्माच्या साहित्याचे केंद्र होते. जैनांनीचव्याकरणाचीरचनाकेली. कन्नड भाषेच्या विकासात महत्वपूर्ण योगदान दिले.संस्कृत भाषेतहीलिखाण केले.
- जैन हे सुरुवातीचे मूर्तिपूजक नव्हते.मात्रपुढील काळात मूर्ती पूजेचा स्वीकार करण्यात आला.
- अहिंसा परमो धर्म हे जैनांचे ब्रीदवाक्य होय.
- जिओ और जिनेदो – हा महावीरांनी दिलेला संदेश होय.

## • जैन साहित्य

आगम: संपूर्ण जैन साहित्याला आगम म्हणतात. (आगम म्हणजे सिद्धांत) हे प्रथम अर्धमागधी, नंतर प्राकृत, अपभ्रंश, आणि संस्कृत भाषेत लिहिले.

कल्पसूत्र: जैन धर्माचा विकास व प्रसार तसेच चंद्रगुप्ताचे जीवन आणि जी धर्म स्वीकार या बद्दल माहिती.

याची रचनाकार - भद्रबाहू, भाषा – संस्कृत

भगवती सूत्र:जैन धर्माचा इतिहास तसेच 16 महाजनपदांचा उल्लेख यात आहे.

पराशिष्ट वर्णन,न्यायावतार, स्यादवाद,मंजिरी,पुराण, पद्म पुराण,महा पुराण हे जैन धर्मातील इतर महत्वपूर्ण ग्रंथ होय.

Sachin Guug

## • **बौद्ध धर्म**

सिद्धार्थ गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माची स्थापना केली. त्यांचा जन्म इ.स.पूर्व 563 मध्ये लुम्बिनी येथे झाला. त्यांचे वडील शुध्होदन कपिल्वस्तुचे राजे होते. गौतमांनी 29 व्या संसार त्याग करून 35 व्या वर्षी बोधगया येथे बोधीवृक्षाखाली ज्ञान प्राप्त केले. त्यानंतर ते गौतम बुद्ध / शाक्यमुनी म्हणून ओळखले जाऊ लागले.

बुद्धांनी पहिले प्रवचन सारनाथ इथे दिले. त्याला धम्मचक्र प्रवर्तन असे म्हटले जाते.

वयाच्या 80 व्या वर्षी इ.स.पूर्व. 483 मध्ये कुशीनगर येथे महापरिवर्तन झाले.

### **बौद्ध धर्माचे विचार आणि तत्वे :**

- जग हे दुखणे भरलेले आहे. आशा, इच्छा, आकांक्षा हि दुखाची करणे आहेत.
- देव व आत्मा मान्य नाही. पुनर्जन्म यावर विश्वास नाही.
- वर्ण व्यवस्था व जाती व्यवस्था अमान्य आहे.
- हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथांमुळे सामान्य लोक या धर्माकडे आकर्षित झाले.

**अष्टांग मार्ग :**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. सम्यक निरीक्षण | 2. सम्यक निश्चय | 3 सम्यक भाषण | 4 सम्यक कृती |
| 5 सम्यक उदरनिर्वाह | 6 सम्यक व्यायाम | 7 सम्यक चिंतन | 8 सम्यक समाधी |

**त्रिशरण :** 1) प्रज्ञा 2) शील 3) समाधी हे अष्टांग मार्गाचा सार आहे.

**प्रसाराची करणे:**

- गौतम बुद्धांची शिकवण साधी सोपी होती.धर्माचे आचरण करण्यासाठी ब्राह्मण व इतर खर्चिक कर्मकांडाची आवश्यकता नाही हे सांगितले. म्हणून गरीब व कनिष्ट जाती आकर्षित झाल्या.
- पाली हि सर्वसामान्यांची भाषा धर्मप्रसारासाठी वापरली.
- धर्म समानतेवर आधारित होता. शुद्रांनी मोठ्या प्रमाणात बुद्ध धर्माचा स्वीकार केला.
- मुक्ती प्राप्त करण्यासाठी वैदिक आणि खर्चिक कर्मकांडांची आवश्यकता नाही. अष्टांग मार्गाने आचरण केल्यास मुक्ती मिळू शकते.
- बुद्धांचे तत्व आणि व्यक्तिमत्व आकर्षक होते.
- संघातील भिक्खू यांची राहणी साधी होती.
- वैदिक धर्मात ब्राह्मनांना महत्व दिले म्हणून क्षत्रिय, वैश्य, आणि शुद्र बौद्ध धर्माकडे आकर्षित झाले.

Sachin Gulig

- आपल्या साध्या तत्वामुळे या धर्मास मोठ्या प्रमाणावर राजाश्रय मिळाला.

. गौतम बुद्धांच्या मृत्युनंतर त्यांच्या शिकवणीचे संकलन करण्याच्या दृष्टीने वेगवेगळया काळात चार बौद्ध परिषदा भरवल्या.

. त्यातून पिटीका ग्रंथांची निर्मिती झाली.

. विनय पिटिका, सुत्त पिटिका, अभिधम्म पिटिका या तीन ग्रंथांनात्रिपिटिका असे म्हणतात.

. हे सर्व ग्रंथ "पाली भाषेत आहेत"

. राजा कनिष्कांच्या काळातील चौथ्या बौद्ध परिषदेनंतर बौद्ध धर्मात फुट पडून हीनयान व महायान असे दोन पंथ निर्माण झाले. पुढे वज्रयान हा एक पंथ उदयाला आला.

& बौद्ध धर्माचा ऱ्हास

- ज्या वेगाने प्रसार झाला त्याच वेगाने ऱ्हास हि झाला. 12 व्या शतकापर्यंत बौद्ध धर्म भारतातून जवळपास लुप्त झाला होता.
- वैदिक कर्मकांडांचा धर्मात शिरकाव झाला होता. मूर्ती पूजेच सुरुवात झाली होती.
- ब्राह्मणांकडून वैदिक धर्मात सुधारणा केल्या होत्या.
- बौद्ध संघात भ्रष्टाचार वाढला होता.
- पाली सोडून संस्कृत भाषेचा वापर.
- स्त्रियांना संघात प्रवेश दिल्यामुळे बौद्ध भिक्षु त्याकडे उपभोगाची वस्तू म्हणून पाहू लागले.
- शिष्य आनंद यास बुद्धांनी सांगितले होते कि जर स्त्रियांना संघात प्रवेश दिला नसता तर धर्म 1000 वर्ष टिकला असता पण प्रवेशामुळे आता तो 500 वर्षेच टिकेल.
- हून, शुंग इत्यादी शासकांनी बौद्ध धर्माच्या विरोधी भुमिका घेतली शैवपंथाचा शशांक गौड याने बोधगया येथील बोधीवृक्ष तोडून टाकला.

## बौद्ध धर्मातील महत्वाची ठिकाणे

1) जन्मस्थान : लुम्बिनी (नेपाल)          2) ज्ञानप्राप्ती : बौद्धगया (बिहार)

3) धम्मचक्रप्रवर्तन : सारनाथ (उ.प्रदेश)          4) महापरिनिर्वाण : कुशीनगर (उ.प्रदेश)

**महत्वाची बौद्ध शिक्षण केंद्रे :** नालंदा          विक्रमशीला          वल्लभी          अमरावती          घंटाशाळा

Sachin Gulig

## बौद्ध परिषदा :

**1) पहिली परिषद : इ.स.पूर्व 487**

ठिकाण – राजग्रीह अध्यक्ष – महाकश्यप

राजा : अजातशत्रू याने भरवली.

सुत्त पिटिका व विनय पिटिका ग्रंथांचे संकलन केले.

**2) दुसरी परिषद : इ.स.पूर्व 387**

ठिकाण : वैशाली अध्यक्ष : सब्बकामी

राजा : कालाशोक

बौद्ध धर्मात फुट पडून महायान आणि हीनयान दोन पंथ बनले.

3) **तिसरी परिषद : इ.स.पूर्व २५५**

ठिकाण : पाटलीपुत्र अध्यक्ष :मोगली - पुत्र तिस्सा

राजा: सम्राट अशोक

**4) चौथी परिषद: इ. स. १००**

ठिकाण: कुंडलग्राम अध्यक्ष: नागसेन

राजा: कनिष्क

| **परिषद** | **वर्ष** | **अध्यक्ष** | **ठिकाण** | **राजा** |
|---|---|---|---|---|
| **पहिली** | इ.स.पूर्व 487 | महाकश्यप | राजग्रीह | अजातशत्रू |
| उद्देश्य: बौद्ध धर्माच्या सिद्धांताचे संकलन करण्यासाठी (सुत्त पीठिका आणि विनय पीठिका) | | | | |
| **दुसरी** | इ.स.पू. 387 | सब्बकामी | वैशाली | कालाशोक |
| परिणाम: बौद्ध धर्मात फुट पडून महायान आणि हीनयान असे दोन पंथ तयार झाले. | | | | |
| **तिसरी** | इ.स.पू 255 | मोगली-पुत्र तीस्सा | पाटलीपुत्र | अशोक |
| उद्देश्य: अभिधम्म ग्रंथाची निर्मिती | | | | |
| **चौथी** | इ.स.पु 1 | वासुमित्र | कुंडलवन (काश्मीर) | कनिष्क |
| उद्देश्य: हीनयान पंथाच्या सिद्धांताला अंतिम स्वरूप देण्यात आले. | | | | |

- **महत्वाचे ग्रंथ**

**1) सुत्त पीठिका**– संकलन - आनंद = बुद्धांच्या उपदेशाचे संकलन

**2) विनय पीठिका** – संकलन – उपाली = बौद्ध भिक्खुंसाठी संघात आचरणाचे नियम.

**3) अभिधम्म पीठिका** – संकलन – मोगलीपुत्र तीस्सा = बौद्ध तत्वज्ञानाचा उल्लेख.

*** दीपवंश आणि महावंश :**

अशोकाच्या आदेशावरून श्रीलंकेत निर्मिती केली गेली. यात अशोकाने सत्ता मिळवण्यासाठी आपल्या 99 भावांचा वध केल्याचा उल्लेख आहे.

Sachin Gulig

*** मिलिंदपन्हो** : मिलिंदचे प्रश्न

मिलिंद आणि बौद्ध भिक्षु नागसेन यांच्यातील संवाद या ग्रंथात आहे. (हा ग्रंथ पाली भाषेत आहे)

***बुद्धचरित** – रचनाकार/ लेखक= अश्वघोष

- गौतम बुद्धांच्या संपूर्ण जीवनपटा उल्लेख यात आहे.

## मौर्य साम्राज्य

. चंद्रगुप्त मौर्याने चाणक्याच्या मदतीने मगधच्या नंदांना हरवून मौर्य साम्राज्याची स्थापना केली.

. मुद्राराक्षस या ग्रंथात विशाखादत्तयांनी चाणक्यांच्या कटकारस्थानांचा उल्लेख केला आहे.

## मौर्य साम्राज्याच्या माहितीचे स्रोत.

. चाणक्याचे अर्थशास्त्र . मेगस्थानीसचे इंडिका

. अशोकाचे शिलालेख व स्थंभलेख

. रोमन लेखक प्लिनी आणि ग्रीक लेखक जस्टीन व प्लूटार्क यांनी चंद्रगुप्ताची माहिती लिहिली आहे.

. महत्वाचे शासक चंद्रगुप्त, बिंदुसार, अशोक

. विस्तार: दक्षिणेकडे ब्रम्हगिरी, संपूर्ण उत्तर भारत, आजचे अफगाणिस्तान, पाकिस्तान व बांगलादेशाचा काही प्रदेश.

## सम्राट अशोक (इ.स.पू. 273 ते इ.स.पू. 232)

. अशोकाने आपल्या वडिलांच्या इच्छेविरुद्ध राज्य मिळवल्याचे उल्लेख मिळतात. यात त्याने आपल्या भावांची हत्या केली.

. अशोकाने त्याच्या कारकिर्दीत फक्त कलिंग विरुद्ध युद्ध लढले.

. कलिंग जिंकल्यानंतर मौर्य साम्राज्याच्या प्राकृतिक सीमा विस्तार पूर्ण झाला होता.

. कलिंग युद्धानंतर त्याने भेरीघोषचा (युद्धाचा)त्याग करून धम्माचा स्वीकार केला होता.

## अशोकाचा धम्म

. अशोकाचा धम्म बौद्ध धर्म नव्हता किंवा नवीन धर्म हि नव्हता. धम्माच्या माध्यमातून त्याने प्रचलित समाजात असणारा तणाव दूर करण्याचा प्रयत्न केला होता.

. त्यांच्या धोरणात वडिलधारे, गुरु, ब्राह्मण, भिक्षु यांना मन देणे, हिंसा न करणे इ. नियम घालून दिले होते.

. धम्माच्या प्रसारासाठी त्याने धम्ममहामत्त या नवीन अधिकाऱ्याची राज्यभर नियुक्ती केली.

## महत्वाचे निर्देश

. प्रसारासाठी भिक्षूंच्या ऐवजी धम्म महामत्त अधिकाऱ्यांची नियुक्ती.

Sachin Gulig

. धम्माचा मुख्य उद्देश्य स्वर्ग मिळवणे तर बौद्ध धर्माचा मोक्ष मिळवले.

. अहिंसा तत्व मान्य परंतु आवश्यक ठिकाणी बळी दिला जात असे. फाशीची शिक्षा कायम होती.

. संदेश पसरवण्यासाठी साम्राज्यात शिलालेख कोरले व स्तंभही उभारले. त्यावरील लेख स्थानिक भाषेत कोरले. त्यासाठी ब्राम्ही लिपी वापरली.

. काही शिलालेखावर अशोक तर काही ठिकाणी देवानुपियदस्सी उल्लेख आहे.

. वायव्य भागातील शिलालेख अरमाईक आणि खरोष्टी लिपीत आहेत.

. धम्मधोरणाच्या प्रसारासाठी पश्चिम आशिया, ग्रीक, श्रीलंका येथे आपले दूत पाठवले.

. अशोकाने स्वत: बौद्ध धर्म स्वीकारला मात्र इतरांवर लादला नाही.

## • मौर्य कालीन जीवन

. आर्थिक घडामोडीवर लक्ष्य ठेवण्यासाठी अधिकारी असत, त्यांना अध्यक्ष म्हटले जात.

. संहर्ता या अधिकाऱ्यावर कर निर्धारनाची जबाबदारी होती.कर वसुली धान्याच्या स्वरुपात होत असे.

## • मौर्य काळातील कला

**१)शिलालेख:** दगडांवर कोरलेले लेख.

**२) स्तंभलेख:**हे अखंड दगडाचे बनवा आहेत.

**३) गुहालेख:**गुफाच्या प्रवेशद्वारांवरील लेख.

. या लेखांवर वेगवेगळ्या राजाज्ञा कोरल्या जात.  सर्वप्रथम 1750मध्ये अशोकाच्या शिलालेखाचा शोध टिफेन फेन्थेलर यांनी लावला. 1837 साली जेम्स प्रिन्सिपने या लेखांचा अर्थ लावला.

## • अशोकाचे बृहद शिलालेख

| शिलालेख | ठिकाण | स्तंभलेख |
|---|---|---|
| कंदहार | अफगाणिस्तान | कंदहार |
| शहाबाजगढी | पाकिस्तान | टोपरा |
| मानसेहरा | पाकिस्तान | मेरुठ/ मेरठ |
| धौली | ओरिसा | इहालाबाद |
| जौगड | ओरिसा | लौरीयाआरराज |
| इरागुडी | आंध्रप्रदेश | रामपूर्वा (बैल कपिटल) |
| सोपारा | महाराष्ट्र | सारनाथ (लॉयन कपिटल) |
| गिरनार | गुजरात | संकीसा(एलीफंट कपिटल) |

Sachin Gulig

. या शिलालेखात अशोकाच्या 14 राजाज्ञांचा उल्लेख आहे.

. इलाहाबाद येथील स्तंभलेख अशोकाने उभारला, नंतर समुद्रगुप्ताने त्यावर हरीसेन लिखित समुद्र गुप्तांची प्रशस्ती कोरली. समुद्रगुप्ताने कौशंबी येथील शिलालेख इलाहाबाद येथे आणले. त्यावर जहांगीर मुघल सम्राट यांनी लेख कोरून घेतले.

. टोपराव मेरुतयेथीलस्तंभलेख फिरोजशहायाने दिल्लीला आणले.

## • मौर्य साम्राज्याच्या पतनाची कारणे

. ब्राह्मण विरोधी धोरण. . अहिंसेवर भर . दान-धर्म . साम्राज्यावर दुर्लक्ष्य

. सत्तेचे केंद्रीकरण . सत्तेविरुद्ध विद्रोह .परकीय आक्रमण

## • मौर्योत्तर भारत (इ.स.पूर्व 200 ते इ.स. 300)

. इंडो-ग्रीक, शक, पर्शियन आणिकुषाण या परकीय सत्ता होत्या. कुशाण हे प्रसिद्ध होते.

**१) इंडो-ग्रीक**: यांनी वायव्य भागातून प्रवेश केला त्यांनी अयोध्या-पाटलीपुत्र पर्यंत मजल मारली. मात्र सत्ता टिकवता आली नाही.

. **मिनंडर (इ.स.पू. 165 ते 145)**

. हा ग्रीक शासक मिलिंद म्हणून प्रसिद्ध आहे. यांची राजधानी साकल (सियालकोट) हि राजधानी होती.

. भिक्षु नागसेन यांनी बौद्ध धर्माची दीक्षा दिली, नागसेन आणि मिलिंद यांच्यातील संवाद "मिलिंदपन्हो"

. ग्रीकांनीच भारतात प्रथम सुवर्ण नाण्यांची सुरुवात केली.तसेच नाण्यावर नाव कोरण्याची प्रथाही पडली

**२) शक:**शक हे पाच शाखांमध्ये भारतात आले.या टोळ्यांनी अफगाणिस्तान, पंजाब, मथुरा, दख्खन इ. प्रदेशात राज्य केले. शकांनी 4 दशके भारतात राज्य केले.रुद्रदामनयाने चंद्रगुप्त निर्मित सुदर्शन तलावाची डागडुजी केली.

**3) पर्शियन**: हे मुलत: इराणचे होते . यांनी शकांचे राज्य नष्ट केले.

. पर्शियनराजा गोंडोफेरस यांच्या काळात सेंट थोमस हेख्रिस्चनधर्म प्रसारक भारतात आला.

**४) कुषाण :**यांनीग्रीक व शकांचा प्रदेश काबीज केला. यांची पहिली राजधानी पेशावर तर दुसरी मथुरा

. यांनीसिंधू नदी खोरे व गंगा खोरे प्रदेश काबीज केला.

## • कनिष्क

. कुषाण शासकांपैकीकनिष्क सर्वात प्रसिद्ध राजा होय.

. याने बौद्ध धर्माला पाठींबा दिला. यांनीच चौथी बौद्ध परिषद भरवली. हिनयानला अंतिम रूप देण्यात आले.

## • भारतीय सत्ता

**१) शुंग घराणे (इ.स.पू. 185 ते इ.स. पू. 72)**

. मौर्य सेनापती पुष्यमित्र शुंग याने सम्राट ब्रूहद्रस्थ यांची हत्या करून शुंग घराण्याची स्थापना केली.

. पुष्यमित्र शुंग हा ब्राम्हण होता. त्याने ब्राम्हण धर्माला प्रोत्साहन दिले.त्यांनी भिक्षूंच्या कत्तली केल्या याची माहिती तारानाथ यांच्या दिव्यवदनग्रंथातून मिळते.

. पुष्यमित्राने दोन अश्वमेध यज्ञ केल्याचा उल्लेख अयोध्या येथील ग्रंथातून मिळतो.

. मनुस्मृतीची रचना याच काळात झाली असावी.

**२) कण्व घराणे : (इ.स.पू. 72 ते 27)**

. शेवटचा शुंग राजा देवभूती यांचा पराभव करून वसुदेव कण्व यांनी राज्य स्थापन केले.

**3) कलिंगचे खारवेल / चेट्टी घराणे :**

.शुंगाच्या समकालीन ओरिसा प्रदेशात राज्य होते.हातीगुंफा शिलालेखावरून या घराण्याची माहिती मिळते.

. खारवेल शासक जैन धर्माचे अनुयायी होते.

**4) सातवाहन: (इ.स.पू. 230 ते इ.स.230)**

. मौर्यांच्या पतनानंतर दक्षिणेत सातवाहनांची सत्ता स्थापन झाली. दक्षिणेतील पहिलेच साम्राज्य होय.

. विंध्य पर्वत व नर्मदा नदीच्या दक्षिणेकडील प्रदेशाला दक्षिण पंथ म्हटले जाते.

. ग्रीक प्रवास वर्णनात राजधानी म्हणून "प्रतिष्ठान" (पैठण) चा उल्लेख आहे.

यांनींच द. भारतात सर्वप्रथम नाणी चलनात आणली.हि नाणी शिसे, चांदी, सोने, तांबे इ धातूंची बनवलीजात.

. नाण्यांवर बैल, हत्ती, सिंह, मानव, वृक्ष, घोडा, चक्र, जहाज, मानवीमुखवटा, राजलक्ष्मी इ. चित्रे असत.

## • सातवाहन साम्राज्याचे महत्वाचे शासक

**१) सिमुक (इ.स.पू 225 ते इ.स.पू. 212)**

. हा सातवाहन साम्राज्याचा संस्थापक होय. शेवटचा कण्व राजा सुशर्मा याची हत्या करून राज्य स्थापन केले.

. नाणेघाट अभिलेखात सुमुकचा उल्लेख आहे, त्याने जैन आणि बौद्ध धर्मांना राजाश्रय दिला.

**२) सातकर्णी प्रथम (इ.स.पू. 195 ते इ.स.पू 185)**

. कलिंगसह सौराष्ट्र, कोंकण, माळवा, विदर्भ या सर्व प्रदेशावर राज्य केल्याने "अप्रतीहत्त चक्र दक्षिणापथपती " हि उपाधी धारण केली. त्यांच्या पराक्रमामुळे नावापुढे सातकर्णी नाव लावण्यास सुरुवात झाली.

.नाणेघाटअभिलेख सातकर्णी प्रथमची राणी नयनिकेनेनिर्माण केले.

Sachin Gulig

**३) गौतमीपुत्र सातकर्णी (इ.स. 106 ते 132)**

. सातकर्णी शासकांपैकी हा सर्वात प्रसिद्ध राजा होय. आई विषयी असणाऱ्या आदरापोटी त्यांनी नावापुढे गौतमीपुत्र नाव लावले.

. वशिष्टपुत्र पुलुवामी याच्या नाशिक शिलालेखात गौतमीपुत्र सातकर्णीचा उल्लेख “त्रिसमुद्रतोय पीत वाहन” (ज्याचा घोडा तीन समुद्राचे पाणी पितो)

**4) पुलवामी चौथा (इ.स. 212 ते 218)**

पुराणानुसार हा सातवाहनांचा शेवटचा राजा होता.

## • सातवाहनकालीन आर्थिक स्थिती

. व्यापारी संघांना निगम किंवा श्रेणी म्हणतात.

. बृहत संहितेत खरीप आणि रब्बी पिकांचा उल्लेख आहे.

. सोपारा, भडोच, कलीआन येथून परदेशी व्यापार चालत. तसेच चीन, रोम बरोबरही व्यापार चालत.

. सातवाहनांनी सोने, चांदी, पोटीन शिसे या धातूंची नाणी चलनात आणली.

. जमीन दान देण्याची पद्धत यांनीच सुरु केली. हि दाने धार्मिक स्वरुपात होती.

. वर्ण व्यवस्था अजून कठोर बनली. व्यापारामुळे नवीन जातींचा उदय झाला.

. संयुक्त कुटुंब पद्धतीत स्त्रीयांना महत्व होते, नावापुढे आईचे नाव लावत.

. सातवाहन वैदिक धर्माचे अनुयायी असूनहि बौद्ध व जैन धर्मांना दान दिल्याचा उल्लेख आहे.

## • सातवाहन साम्राज्याचा ऱ्हास

. शकांच्या आक्रमणामुळे राज्य दुबळे बनले. . युद्धामुळेआर्थिकस्थिती बिघडली होती.

## • संगम साहित्य

. संगम म्हणजे सभा. या सभेत तत्कालीन ब्राह्मण, तत्वज्ञ इ. समावेश असे.या सभातून जे साहित्य निर्माण झाले त्यास संगम साहित्य म्हटले गेले. हे साहित्य काव्यात्मक पद्धतीचे आहे.

. चोल, पांड्य, चेर/ केरळ हि दक्षिणेतील सुरुवातीची राज्ये होती.

. मान्यतेनुसार एकूण तीन परिषदा/ सभा भरल्या. त्या कीतीकालावधीनंतर भरल्या याची माहिती उपलब्ध नाही.

**१) पहिली संगम परिषद:** ठिकाण – मदुराई अध्यक्ष – अगस्त्य ऋषी

तयार केलेले साहित्य – अकवीवम, परीनादल

**२) दुसरी संगम परिषद :** ठिकाण–कथाटपूरम साहित्य – तोलकापिराम

**३) तिसरी संगम सभा :** ठिकाण – मदुराई

Sachin Gulig

तयार केलेले साहित्य –तीरुकुलर, सिलाप्पाडीकरम, मानिमेकलाई, जीविका-चिंतामणी

. संगम साहित्याचे संकलन इ.स. 300 ते इ.स. 600 या काळात झाले.

. संगम साहित्यात महाश्म संस्कृती ज्यात मृतांना पुरल्यावर पुरलेल्या जागेच्या आजूबाजूला मोठी दगडे लावतात.

. संगम साहित्यात गंगा, शोणइ. नद्या तर पाटलीपुत्र, मदुराई इ. शहरांचा उल्लेख आहे.

. संगम काळात दक्षिण प्रदेशांना "तमिळगम" म्हटले जात.

. संगम साहित्यानुसार संगमसभा 9100 वर्ष चालल्या आणि त्यात 8500 पेक्षा जास्त कवींनी भाग घेतला. या काळात 197 पांड्य राजे होऊन गेले. (हे अतिरंजित असू शकते)

. मेगास्थनिस ला पांड्य राज्याबद्दल माहिती होती. याचा उल्लेख इंडिका ग्रंथात आहे.

. संगम काळात लोक "मरुगन" या देवाची पूजा करत. पुढे त्यालाच सुब्रमणीय म्हणून ओळखले गेले.

## • संगम साहित्याची विभागणी

१) निवेदनात्मक:यात शौर्यगाथा वर्णन करणारे काव्य आहे. त्यास"मेलकन्नक्कू" म्हणतात.

२) उपदेशपर: यात आचरणाचे नियम आहेत. हेप्राकृत व संस्कृत तज्ञ लोकांकडून लिहिले आहेत त्यास"किलकन्नक्कू" असेम्हणतात.

३) सिलप्पडीकरम (प्रेमकथा) व मनिमेकलाई हे दोन तमिळ महाकाव्य आहेत.हे सेनगुट्टूवन यांच्या काळात लिहिले.

## • संगम कालीन दक्षिणेतील राज्ये

**१) चोल:** राजधानी उरेयुर हे शहर होते. ते कापूस व्यापाराचे केंद्र होते.

. चोल शासक कारिकल याने पुहार (कावेरीपटनम) शहर वसवले.

. चोलांनी श्रीलंका जिंकून काही काळ तेथे राज्य केले.

**२) पांड्य:** मदुराई हि राजधानी.

. पांड्य राज्य मोतीसाठी प्रसिद्ध आहे.

यांचा रोमन राजासोबत व्यापार चालत.

**३) चेर:** मुझरीस हि राजधानी होय. या बंदरावरून रोम सोबत व्यापार चालत.

## • ग्रीक नाणे

. ग्रीकभारतात येण्यापूर्वी इथे ठसा असणारी नाणी चलनात होती. त्यांचा आकार व वजन सारखेच असेल असे नव्हते, मात्र ग्रीकांनी भारतात सर्वात जास्त सोन्याचे नाणे काढली.हि नाणी समानआकार व वजनाची असत.यानाण्यांवर एका बाजूला राजाचे नाव व

Sachin Gulig

कालखंड दिलेला असत तर दुसऱ्या बाजूला ग्रीकदेवतांची चित्रे असत.यानाण्यावरब्राम्ही लिपीत लिहिले जात. मात्र हि नाणी खूपच मर्यादित होती. राजाची वंशावळ व कार्यकाल लिहिण्याची पद्धती भारतीयांनी स्वीकारली.

## • महायान पंथाचा उदय

. मध्य आशियातून आलेल्या शासकांनी भारतीय धर्म स्वीकारले. अनेकांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करून राजाश्रय दिला कारणब्राह्मण धर्मात शासक असूनही कनिष्ट स्थान दिले होते.

. बौद्ध धर्म नवीनघटकांना सामावून घेण्यात अग्रेसर होता. परदेशी लोक मांसाहार करत त्यांनाही संघात प्रवेश देण्यात आला. व्यापार वाढीमुळे व राजाश्रयामुळे संपत्तीचा प्रचंड ओघ बौद्ध धर्माकडे लागला.परिणामी संघाच्या आचरणात ढिलेपण आले.

. संघातील भिक्षु सोने चांदी हि दान म्हणून घेऊ लागल, अनेक्कानी मांसाहार सुरु केला. काहींनी गृहस्थ जीवनात प्रवेश केला.बुद्धांच्या उपासनेची जागा मुर्तीपुजेने घेतली, या नवीन पंथाला "महायान" म्हटले गेले.आणि जुन्याच पद्धतीने उपासना करणाऱ्यांना हीनयान म्हटले.

## • गांधार, मथुरा, अमरावती कालाशैली.

. साधारणपणे इ.स.च्या सुरुवातीला या शिल्पकला विकसित झाल्या.

. गांधार हे ठिकाण आजच्या पेशावर, पाकिस्तानजवळ आहे.

. मथुरा हे उ.प्रदेश राज्यात आहे.

. अमरावती हे आजच्या आ.प्रदेश राज्यात आहे.

## • गुप्त साम्राज्य

. उत्तर भारतात कुषानांची सत्ता कमजोरझाल्यानंतर गुप्त साम्राज्याची स्थापना झाली. इ.स. 300 ते 600 गुप्त साम्राज्याचा काळ मानला जातो.

. पाटलीपुत्रगुप्तांची राजधानी होती.आजचे उ.प्रदेश, बिहार गुप्तांचे सत्तेचे केंद्र होते.मौर्य साम्राज्यापेक्षा गुप्त साम्राज्य लहान होते.

## • गुप्तांच्या माहितीचे स्रोत

१) हरीसेन लिखित इलाहाबाद प्रशस्ती (समुद्र्गुप्त)

२) मेहरौली, दिल्ली येथील लोहस्तंभ (चंद्रगुप्त दुसरा)

३)उदयगिरी लेणी (चंद्रगुप्त दुसरा)

४)गुप्तकालीन नाणी

५) साहित्य – विशाखदत्तचे "देवी चंद्र्गुप्तम"

६) परदेशी प्रवासी फाहीयान

## • प्रमुख गुप्त शासक

. गुप्त साम्राज्याची स्थापना श्रीगुप्ने केली.त्यानेइ.स. 275 स्तप्ना केली (अंदाजे)

Sachin Gulig

## **१) चंद्रगुप्त पहिला (इ.स. 319 ते 334)**

. गुप्त कुटुंबातील महत्वाचा पहिला शासक होय. त्याने“महाराजाधिराज” पदवी मिळवली.

. गुप्तहेवैश्य होते. याने लीच्छवी राजकुमारी कुमारदेवीशी लग्न केले.

. राज्यरोहन प्रसंगीत्याने गुप्त संवाटची (शके) 319-320 साली सुरुवात केली. त्यामुळे गुप्त संवत प्रवर्तक म्हटले जाते.

## **२) समुद्रगुप्त (इ.स. 335 – 380)**

. यांच्या काळात साम्राज्य विस्तार हिमालयापासून नर्मदेपर्यंत झाला.

. आयुष्यात तो एकही युद्ध हरला नाही. त्यामुळे त्याला भारताचा नेपोलियन म्हणतात.

. श्रीलंकेचा राजा महेंद्रवर्मन यानेगया येथे बौध्द मंदिर बांधण्याची परवानगी मिळावी यासाठी आपला राजदूत समुद्र्गुप्ताकडे पाठवला होता.

. समुद्रगुप्त विद्वान आणि कवीही होता. म्हणून कविराज म्हणून हि स्तुती केली जाती.

. त्यांच्या दरबारात हरीसेन,बौद्धभिक्षु वसुबंधू वअसंग हे विद्वान होते.

## **३) चंद्रगुप्त दुसरा (इ.स. 380 – 414)**

. याने उज्जैनला दुसऱ्या राजधानीचा दर्जा दिला.बंगाल विजया नंतर त्याने“विक्रमादित्य” किंवा “विक्रमांक” अशी उपाधी धारण केली.

. यांच्या काळात फाहीयान(399-414) या चीनी प्रवाशाने यात्राकेली.

. याने वैदिक धर्माचा पुरस्कार केला. त्याने मोठ्या प्रमाणात सोन्या-चांदीची नाणी काढली.

## **४) स्कंद गुप्त (455 – 464)**

- स्कंद गुप्ताने चंद्रगुप्त मौर्यद्वारे बांधलेला सुदर्शन तलाव दुरुस्त केला.

## *** गुप्त कालीन शासन.**

. राजा हा प्रशासनाचा केंद्रबिंदू होता. गुप्त शासक परमभट्टारक, महाराजाधिराज, परमेश्वर इ. पदव्या धारण करत असत.

. गुप्तांनी ब्राह्मण धर्माचा स्वीकार केला.त्यांच्या अनेक नाण्यावर विष्णू देवतेचे चित्र असत.

. गुप्त शासक स्वत:चे सैन्य बाळगत, मात्र गरज पडल्यास सरंजामदार त्यांना सैन्य पुरवत.

अधिकाऱ्यांना रोख तसेच जमीनदान पद्धतीनेही पगार दिला जात असे.जमींनदानामुळे सत्तेचे विकेंदीकरण होत होते.

## *** स्थानिक संघटक प्रमुख**

. नगरश्रेष्टी : शहराचा प्रमुख व्यापारी

Sachin Gulig

. सार्थवाह : बंजारा/ वाहक गटांचा प्रमुख

. सरंजामदार/ मांडलिक : गुप्तांच्या अधीन हे स्वातंत्र्य कारभार करत.

. पुस्तपाल: जमीन खरेदी विक्री व्यवहारांची माहिती ठेवतअसे.

. याच काळात दंड विधान व कायद्यांचे संहितीकरण झाले.वर्णानुसारकमी जास्त शिक्षा देण्याची पद्धती सुरु झाली. ब्राह्मणांना कमी तर शूद्रांना जास्त शिक्षा दिली जात.

## • गुप्त कालीन सामाजिक स्थिती

. जमीनदानामुळे ब्रह्माचे महत्व वाढले. ब्राह्मांनानी स्वत:कडे अनेक विशेषाधिकार घेतले. नारदस्मृती यात उल्लेख आढळतो.

. मनुस्मृतीत 60 जातींचा उल्लेख आढळतो. परकीय राजांनी ब्राह्मांनादाने दिली त्या बदल्यात्यांना क्षत्रिय दर्जा दिला.

. वर्ण व्यवस्था अधिक कठोर बनली वर्णानुसार शिक्षा, व्याजदर, राहण्याचे ठिकाण तसेच घरांचा आकार व प्रकार हि  ठरत.

. या अस्पृश्यांची संख्या वाढली. चांडाळ हा अस्पृश्य समजला जात.तो गावाच्या बाहेर राहत.अस असा उल्लेख फाहीयान या प्रवाशाने केला. शुद्र लोक कृष्णाची पूजा करत.

. या काळात कायस्थ (कारकुनाचा व्यवसाय करणारे) या जातीचा उदय झाला.

## • गुप्तकालीन स्त्री-जीवन

. जमिनदारांमुळे जमिनिचे केंद्रीकरण झाले.त्यातून बहुपत्नीत्वाची प्रथा वाढीस लागली.स्त्रियांना मालमत्तेचा भाग समजू लागले.

. शुद्राप्रमाणे स्त्रियांनाही रामायण, महाभारत, वेद्ऐकण्याचीपरवानगीमिळाली.

. स्त्रियांना मालमत्तेचा अधिकार नव्हता, कात्यायन या कायदेतज्ञाने स्त्रीलातीची व्यक्तिगत संपती आणि स्त्रीधन विकण्याचे पूर्ण अधिकार दिले.

. उच्चवर्णातील स्त्रिया उदरनिर्वाहासाठीपूर्णपणे पतीवर अवलंबून होत्या. याचा परिणाम म्हणून सती प्रथा वाढीस लागली.मात्रतीउच्च वर्णीयांमध्ये अधिक प्रचलित होती. सतीचा पहिला लिखित पुरावा इ.स. च्या 510 च्या ऐरण येथील शिलालेखात सापडतो.

.स्त्रियांना पुनर्विवाहाचा अधिकार नव्हता. या काळात बालविवाहाचे समर्थन हि केले आहे.

## • गुप्त कालीन धर्म

**.** गुप्तकाळात बौद्ध धर्माला पूर्वी इतका राजाश्रय मिळाला नाही. मात्र या धर्माची अजूनही भरभराट सुरूच होती.

. बौद्ध धर्माच्या महायान पंथावर तांत्रिक पद्धतीचा पगडा पडल्याने वज्रयान या नवीन पंथाची निर्मिती झाली, याच काळात श्रीलंका, ब्रम्हदेश, कंबोडिया, चीन या देशात बौद्ध धर्माचा प्रसार झाला. ब्राम्हणी प्रभावातून महायान पंथाने हि मूर्ती पूजेला सुरुवात केली.

. ब्राम्हांप्रमाणे बौद्धांनाही खर्चासाठी जमिनी दान दिल्या जाऊ लागल्या. नालंदा विद्यापीठाला २०० गावे दान दिल्याचा उल्लेख आढळतो.

Sachin Gulig

. तुलनेत जैन धर्म स्थिर आणि सनातन राहिला. इ. स. ३१३ मध्ये मथुरा येथे पहिली जैन परिषद भरली. यात जैन धर्माचे प्रमाण ग्रंथ ठरवण्यात आले. तसेच इ. स. ४५३ मध्ये गुजरातच्या वल्लभी येथे दुसरी जैन परिषद भरवली.

. मथुरा व वल्लभी हे श्वेतांबरांचे तर पंडूवर्धन हे दिगंबरांचे केंद्र होते.

. गुप्त काळात विष्णू मुख्य देवता बनले. नारायण हि अवैदिक जमातीची देवता होती. विष्णू व नारायण यांना मिळून नारायण-विष्णू नावाने ओळखले जात. यातून भागवत किंवा वैष्णव धर्माची निर्मिती झाली. भक्ती व अहिंसा हि भागवत धर्माची महत्वाची तत्वे होती. तीळ हे पिक विष्णू देवतेला अर्पण करण्याची प्रथा याच काळात प्रचलित झाली.

. भक्तीचे तत्व भगवतगीतेने प्रतिपादित केले. गीतेतच विष्णूच्या अवतारांची संकल्पना मांडली गेली. कृष्ण हाच विष्णूचा अवतार मानला गेला.

. विष्णूचे इतर अवतार मत्स्य, कूर्म, वराह, वामन, राम, कल्की, परशुराम इ. होत कल्की हा अवतार कलयुगाच्या शेवटी होणार असल्याचे मानले जाते.

. वायू पुराणात विष्णूच्या अवतारांची यादी दिली आहे, परंतु त्या अवतारांची नावे सामान्य, मान्यतेपेक्षा वेगळी आहेत. भागवत पुराणात विष्णूंच्या सर्व अवतारांचे वर्णन आहे.

. भगवतगीतेने चार प्रकारचे योग सांगितले आहेत, कर्मयोग, ज्ञानयोग, राजयोग, भक्तियोग इ. यात व्यक्ती जीवनाविषयी आदेश आहेत.

. शिव हा या काळात मुख्य देवता नव्हता तो शैव पंथाचा देव होता. पुढील काळात पशुपत, अघोरी, कापालिक, नाथ, काश्मिरी शैव, नैयमार, शैव, वीर शैव, इ. उपपंथ निर्माण झाले.

. गुप्त काळात अनेक धर्मात पंथ, उपपंथ निर्माण झाले. तसेच सर्व धर्माचा प्रसारही झाला. परिणामी सर्व धर्माबाबत सहिष्णुतेचे धोरण अवलंबले.

- **शिक्षण व्यवस्था**

**.** गुप्तांच्या काळात शिक्षणाचा बराच प्रसार झाला होता. साहित्यात आचार्य, उपाध्याय, ब्रम्ह्चरीन, असे उल्लेख आढळतात.

. नालंदा सारखे विश्वविद्यापीठ याच काळात सुरु झाले. इ. स. ५ व्या शतकात **कुमारगुप्त पहिला** याने नालंदा विद्यापीठाची स्थापना केल्याही मान्यता आहे. फाहीयान याने विद्यापीठात अभ्यास केला होता. विद्यापीठाच्या खर्चाची व्यवस्था करण्यासाठी २०० गावे दान दिल्याचा त्याने उल्लेख केला आहे. विद्यापीठात रत्नसागर, रत्न व रक्तरंजक नामक तीन मोठे ग्रंथालय होते. नालंदा हे मुख्यत: बौद्ध धार्मिक केंद्र होते. जगातील वेगवेगळया देशातून विद्वान येथे अध्ययनासाठी येत असे. हुई – नेह या कोरियन प्रवाशाने सुद्धा नालंदा येथे येथे अध्ययन केले होते. पुढील काही काळात नालंदा येथे वेद पुराणांचेहि अध्ययन सुरु केले. विद्यापीठात प्रवेशाकरिता पूर्व परीक्षा घेतली जात असे. फक्त २० % लोकांना प्रवेश मिळत होता, तर उर्वरत ८० % लोकांना प्रवेश नाकारला जात.

. नालंदा विद्यापीठातील काही महत्वपूर्ण शिक्षक, नागार्जुन, अंग, शिलभद्र, वसुबंध, दिनंग, धर्मपाल, चंद्रपाल, प्रमामित्र, मिनमित्र, जनचंद्र इ.

- बख्तियार खिलजी याने सन ११९३ साली नालंदा विद्यापीठ पूर्णपणे उध्वस्त केले.

Sachin Gulig

## • गुप्तकालीन कला

. धर्म हा गुप्तकालीन कलेचा आधार होता. अजिंठा लेणीतील चित्रे हि मुख्यत: गुप्त काळात निर्माण झालेली आहे. मात्र यात प्रत्यक्ष गुप्तांचा सहभाग नव्हता.

. या काळात मूर्ती पूजा आणि मंदिरांचा मोठ्या प्रमाणात विकास होण्यास सुरुवात झाली.

. गुप्त शासक हे वैदिक ब्राम्हण धर्माचे पुरस्कर्ते होते. परिणामी या काळात विष्णू, शिव इ. हिंदू देवतांच्या मूर्ती मोठ्या प्रमाणात विकसित झाल्या. हिंदू मूर्ती बरोबरच जैन व बौद्ध मूर्ती ही या काळात विकसित झाल्या.

. २५ फुटी तांब्याची बुद्ध मूर्ती पहिल्याचा उल्लेख फाहीयान करतात. सुलतान गंज व दिदार्गांज येथे ब्राँझ च्या मोठ्या बुद्ध मूर्ती सापडल्या आहेत.

. गुप्त काळात भुमरा, तिगवा, नचना कुठार, देवगड, भितरगाव, सांची, कशी इ. ठिकाणी मंदिरे उभारली गेली. हि मंदिरे साधी व विटांच्या बांधकामाची होती.

. गुप्त काळाला भारताचा सुवर्णयुग समजले जाते. गुप्त काळात व्यापार पूर्वीपेक्षा कमी झाला होता. मात्र कला आणि साहित्याचा प्रचंड विकास या काळात झाला. गुप्तांनी सर्वाधिक संख्येने सोन्याची नाणी काढली. त्यामुळे व्यापार कमी असूनही गुप्त काळात सुवर्ण युग मानले जाते.

## • गुप्त कालीन साहित्याचा विकास:-

**.** गुप्त काळात साहित्याचा प्रचंड विकास झाला. धार्मिक तसेच निधार्मिक दोन्ही प्रकारचे साहित्य गुप्त काळात लिहिले गेले. साहित्याच्या बाबतीत गुप्त हा अभिजात काळ (classical age).

**१) मृछकटीक – नाटक (लेखक- शूद्रक):-** या नाटकात एक गरीब ब्राह्मण चारुदत्त व वेश्येची सुंदर कन्या वसंतसेना यांच्या प्रेमकथेचे वर्णन आहे.

**२) मुद्रा राक्षस नाटक** (लेखक - विशाखादत्त), (दुसरा ग्रंथ – देवी चंद्रगुप्तम):- चाणक्याने कशा प्रकारे मौर्य सम्राट चंद्रगुप्तला मदत करून सत्ता मिळवून दिली याचे वर्णन आहे.

**३) भास:** या नाटककाराने गुप्त काळात १३ नाटके लिहिली.

**४) कालिदास:** जगातील सर्वश्रेष्ठ कवी समजला जातो. भारताचा शेक्सपिअर हि म्हटले जाते. कालिदास हा चंद्रगुप्त दुसरा याच्या दरबारातील कवी होते.

**- कालिदासचे साहित्य:**

> **मेघदूत:** कुबेरच्या राज्यातील यक्ष याने आपली पत्नी अलका हिला ढंगाच्याद्वारे संदेश पाठवला.

> **अभीज्ञानकुंतलम:** दुष्यंत राजा व वन कन्या शंकुतला यांच्या प्रेमकथेवरील नाटक आहे. जगातील १०० सर्वोत्कृष्ट साहित्यात याचा उल्लेख होतो.

> **रघुवंश:** रामाच्या विजयाचे वर्णन आहे.

> **ऋतूसंहार:-** सहा ऋतूंचे शृंगारिक वर्णन आहे.

**५) अमरसिंह:-** अमरकोश हा ग्रंथ लिहिला. हा संस्कृत शब्दकोश असून त्याला नामलिंगानुशासन असेही म्हटले जाते.

Sachin Gulig

गुप्त काळात रामायण व महाभारत यांची निर्मिती पूर्ण झाली. कायदे विषयक स्मृती ग्रंथाचेही संकलन याच काळात झाले.

@ **निधर्मी साहित्य:-** गुप्तकाळात मोठ्या प्रमाणात निधर्मी साहित्याची निर्मिती झाली. या ग्रंथातून विज्ञानाचे अनेक मूळ सिद्धांत मांडले गेले.

@ **आर्यभट:-** याने आर्यभातिय हा ग्रंथ लिहिला खगोलशास्त्रीय हा ग्रंथ असून पृथ्वी सूर्याभोवती फिरते असे प्रतीपादन या ग्रंथात केले आहे.

@ **वराह – मिहीर:-** खगोलशास्त्रावर "पंच सिद्धांत" हा ग्रंथ लिहिला. तसेच फलज्योतिषावर लघु जातक व बृहत जातक हे दोन ग्रंथ लिहिले.

## ➢ गुप्त साम्राज्याची ऱ्हासाची कारणे:-

**.** जमीन दानाच्या पद्धतीमुळे सरंजामदारांचे सामर्थ्य वाढले आणि गुप्त साम्राज्याची पीछेहाट झाली.

. जमीन दान दिल्याने राज्याचे उत्पादन कमी झाल्याने आर्थिक संकट ओढवले.

. परकीय व्यापार कमी झाल्याने सुद्धा आर्थिक परिस्थिती खालावली. परिणाम स्वरूप या काळात सोन्याच्या नाण्यांची संख्या घटली.

. इ. स. ४८५ पासून सुरु झालेल्या हुणांच्या आक्रमणामुळे राज्य दुर्बल बनत गेले.

. हून हि मध्य आशियातील भटकी जमत होती. इ. सणाच्या ५ व्या शतकाअखेर हुनांनी पंजाब प्रांतात स्वतःचे राज्य निर्माण केले. सियालकोट (मिनांडर – कुषाणची राजधानी) येथे आपली राजधानी स्थापन केली. तोरमण व मिहीरकुल हे महत्वाचे राजे होते. हुनांमधून पुढे काही राजपुत जमाती पुढे आल्या.

. गुप्त साम्राज्य इ. स. च्या ६ व्या शतकापर्यंत अस्तित्वात होती. तरी त्यांना गतवैभव उरले नव्हते.

## • हर्षवर्धनचा काळ

**.** गुप्त साम्राज्याच्या अस्तानंतर गुप्तांच्याच सरंजामदारांपैकी एक हर्षवर्धन याने सत्ता स्थापन केली. त्याची राजधानी कनौज येथे होती. त्याने सर्व दिशांनी साम्राज्याचा विस्तार केला.

. बाणभट्टच्या हर्षचरित या ग्रंथातून हर्षच्या कारकिर्दीची माहिती मिळते. तसेच ह्युएनत्संग या चीनी प्रवाशाच्या वर्णानातून हर्षाबद्दल माहिती मिळते.

. राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, काश्मीर, बिहार, ओरिसा या प्रदेशावर त्याचे प्रत्यक्ष राज्य होते. तसेच सभोवतालच्या प्रदेशांनी त्यांचे प्रभुत्व स्वीकारले होते.

## • वाकाटक घराणे

. सातवाहन साम्राज्याच्या ऱ्हासानंतर महाराष्ट्रात वाकाटक घराण्याचा उदय झाला.

Sachin Gulig

. वायुपुरान व बिदर ताम्रपटात विंध्यशक्ती याचा वाकाटक घराण्याचा संस्थापक म्हणून उल्लेख केलेला आहे.

. विंध्यशक्ती व प्रवरसेन पहिला हे वाकाटक घराण्याचे प्रमुख शासक होते. प्रवरसेनने साम्राज्याची विभागणी गौतमीपुत्र आणि सर्वसेन या दोन पुत्रांमध्ये केली होती यातील गौतमीपुत्राची शाखा नंदिवर्धन येथे तर दुसरी शाखा वत्सगुल्म (वाशीम) येथे उदयाला आली.

. वाकाटक सामंतशाही राज्य होते. वाकाटक काळात राजलाही जमीन विकत घ्यावी लागे. प्रवरसेन दुसरा याने याने रामटेक येथे मंदिरासाठी जमीन विकत घेतल्याचा उल्लेख आढळतो.

. वाकाटक ब्राह्मण असावेत आणि त्यांनी वैदिक धर्माचा पुरस्कार केला. या काळात बौद्ध धर्माचा राजाश्रय संपला असूनही वाकाटकांनी बौद्धबद्दल सहिष्णू धोरण अवलंबिले.

. वाकाटक काळात भक्तीस महत्व वाढले. याच काळात भागवत धर्माचा विदर्भात प्रसार झाला. जैन धर्मातही मूर्ती पूजेची सुरुवात झाली.

. वाकाटक राजा सर्वसेन याने हरिविजय हे कृष्णाच्या जीवनावर आधारित महाकाव्य लिहिले. कालीदासने मेघदूत या ग्रंथाची रचना वाकाटकांच्या दरबारात असतानाच दरबारातच केली होती.

. अजिंठा येथे वाकाटक काळात विविध लेण्यांचे खोदकाम तसेच चित्रकामही झाले.

## • कांचीचे पल्लव

. पल्लव घराण्याने इ. स. २७५ – ८९७ पर्यंत दक्षिण भारतावर राज्य केले. कांचीपुरम हि पल्ल्वांची राजधानी होती.

. सिंहवर्मन हा पल्लव घराण्याचा संस्थापक समजला जातो. सिंहविष्णू, महेंद्रवर्मन, नरसिंह वर्मन हे पल्लव घराण्याचे प्रमुख शासक समजले जातात. अपरीचीत वर्मन हा शेवटचा पल्लव राजा आहे.

. ह्युएनत्संग याने पल्लव राज्याला भेट दिली होती.

. पल्लवांनी महाबलीपुरम येथे प्रसिद्ध शोर मंदिर बांधले होते.

## • चालुक्य साम्राज्य

. इ. स. ६ व्या शतकाच्या सुमारास दक्षिणेत चालुक्यांचा उदय झाला. वाकाटकांच्या अस्तानंतर चालुक्य प्रमुख शासक बनले. चालुक्यांच्या एकूण चार शाखा होत्या.

१) बदामीचे चालुक्य (मूळ शाखा)    २) कल्याणीचे चालुक्य    ३) वेंगीचे चालुक्य

४) अन्हीलवाडचे (गुजरात) चालुक्य किंवा सोळंकी

Sachin Gulig

**१) बदामीचे चालुक्य:-**

**-** वाकाटकानंतर बदामीच्या चालुक्यांनी महाराष्ट्रावर राज्य केले. हे चालुक्य कदंबाचे सामंत होते. कदंबाची सत्ता लयास गेल्यावर चालुक्यांनी आपली सत्ता स्थापन केली.

- जयसिंह, पुलकेशी पहिला, किर्तीवर्मन पहिला, मंगलेश, पुलकेशी दुसरा, विक्रमादित्य इ. चालुक्यांचे महत्वाचे शासक होते.

**२) कल्याणीचे चालुक्य:-**

**-** हे चालुक्य मध्ययुगात मोडतात. यांना पश्चिम चालुक्य असेही म्हणतात.

- तैलप व सोमेश्वर हे या घराण्याचे शासक होते. सोमेश्वरच्या काळात देवगिरीच्या यादवांनी हल्ला करून यांचे राज्य संपवले.

**३) वेंगीचे चालुक्य:-**

- हे बदामीच्या चालुक्यांचे वारसदार होते. त्यांना पूर्व चालुक्य हि म्हणतात. विष्णूवर्धन हा घराण्याचा संस्थापक होता.

- चोलांनी यांना हरवून त्यांची सत्ता स्थापन केली.

**४) अन्हीलवाडचे चालुक्य किंवा सोळंकी**

**-** गुजरातच्या काठियावाड प्रांतावर यांची सत्ता होती. मुलराज हा या घराण्याचा संस्थापक समजला जातो.

- यांच्याच काळात गजनीच्या मेहमूदने सोमनाथ मंदिरावर स्वारी केली.

- अजिंठा लेण्यातील काही भित्तीचित्रे हि चालुक्यांच्या काळात विकसित केली होती.

- चालुक्य काळात नागर व द्रविड या शैलीच्या मिश्रणातून चालुक्य शैलीचा विकास झाला. या शैलीत नक्षीदार उंच शिखरे, गोल गुळगुळीत स्तंभ, घुमटाकार छत, भिंत व छतावर सुरेख चित्रे हि चालुक्य शैलीची वैशिष्टे होती. एहोल, बदामी, पट्टदकल हि चालुक्य शैलीची प्रमुख केंद्र होती.

- **परदेशी प्रवासी**

**तारानाथ:** हा तिबेटीयन लेखक होता. त्याने कग्युर व तग्युर या ग्रंथांची रचना केली.

**मार्कोपोलो:-** हा व्हेनिशियन प्रवासी होता ज्याने ३ ऱ्या शतकाच्या शेवटी पांड्य राज्याला भेट दिली.

**हेरोडोटस:-** हा पहिला ग्रीक / युनानी इतिहासकार होता. यानेच पहिल्यांदा इतिहासासाठी हिस्ट्री शब्दाचा उपयोग केला. त्याने हिस्टोरिका नामक ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथातून भारत, इराण, ग्रीक यांच्यातील व्यापाराबद्दल माहिती मिळते. मात्र हा कधीही भारतात आला नाही.

**डाईमेकस :-** हा बिन्दुसारच्या दरबारात सिरीयाचा राजदूत म्हणून आला होता.

**डायोनियस:-** हा अशोकाच्या दरबारात इजिप्तचा राजदूत म्हणून आला होता.

Sachin Gulig

**टोलेमी :-** या रोमन प्रवाशाने इ. स. ८० ते ११५ या काळात भारतातील विविध बंदरांना भेटी दिल्या. यांच्या प्रवास वर्णानातून भारताच्या परदेशी व्यापार संबंधाबाबत माहिती इलते.

**फाहीयान:-** इ. स. ३९९ – ४१४ या काळात त्याने भारताची यात्रा केली. त्याचे मूळ नाव कुंड होते. त्याने पाटलीपुत्र शहरात ३ वर्ष राहून संस्कृत भाषेचे अध्ययन केले. तसेच गुप्त सम्राट चंद्रगुप्त द्वितीय (विक्रमादित्य) त्यांच्या दरबारात हि भेट दिली. भारतीय लोक गंगानदीच्या पाण्यास पवित्र मानतात, तसेच मध्य देश संपन्न असून येथील लोक जीवांची हत्या करत नाहीत असे वर्णन त्याने केले आहे.

**इत्सिंग:-** हा चीनी प्रवासी ७ व्या शतकात भारतात आला होता.

त्याच्यानुसार श्रीगुप्त हा गुप्त घराण्याचा संस्थापक होता. पिटिका ग्रंथाचे रुपांतर करून चीनला गेला.

**सुंगयुन:-** इ. स. ५१० मध्ये भारतात आला. ३ वर्ष भारतात राहून बौद्ध साहित्याचे संकलन केले व त्यानंतर मायदेशी परतला.

**ह्युएनत्संग:-** हा चीनी प्रवासी इ. स. ६२९ साली भारतात आला होता. यांच्या ग्रंथाचे नाव सि. यु. कि. हे होते.

- हे हर्षवर्धनच्या कनौज दरबारात हि हजेरी लावली. त्याने नालंदा विद्यापीठात काही काळ अध्ययनाचे कार्य केले. यावेळी शीलभद्र हे नालंदा विद्यापीठाचे कुलगुरू होते.
- यांच्या मते भारतामध्ये सती व विधवा या प्रथा नव्हत्या.
- शेतकऱ्यांना शुद्र म्हणून संबोधतो.
- अस्पृश्य शहराबाहेर राहतात, शहरात येण्यापूर्वी ते मोठा आवाज करून आपल्या येण्याची सूचना करत जेणेकरून इतर लोक बाजीला होतील.

**प्लिनी :** प्लिनी भारतात पहिल्या शतकात आले होते. प्लिनी द्वारा लिखित "नॅचुरल हिस्ट्री" (Natural History) या पुस्तकात भारतातील पशु, पक्षी, प्राणी, वृक्ष, खनिजे इ. बाबतीतची माहिती मिळते.

**अल्बरुनी :** हे मुहमद गजनी सोबत भारतात आले होते. यांनी तेहकिक-ए-हिंद (किताबुल हिंद) नामक पुस्तकाची रचना केली. यात हिंदूंचा इतिहास, समाज, रिती-रिवाज तथा राजनीतीचे वर्णन केले आहे.

Sachin Gulig

**प्राचीन भारताचा इतिहास**

**By Sachin Gulig**

**9545600535**

**@india123**